# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/03/2024 (सोमवार) दुपार


---

## पोस्टे जलालखेडा हद्दीतील मौजा उमठा पारधी बेडा येथे अवैधरित्या मोहफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

आज दि. ११/०३/२०२४ रोजी धवडपेठ पारधी बेडा येथे पो.स्टे.जलालखेडा हद्दीत मोजा उमठा पारधी बेडा व शिवारात अवैधरित्या गावठी पद्धतीने भट्टी लावून मोहाफूल गावठी दारू गाळणारे इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु गाळणारे **आरोपी नामे– १) आनंद मोहन पवार , वय ३२ वर्ष, २) राजेंद्र जनार्दन पवार , वय ३९ वर्ष, ३) सलीम सुरेंद्र पवार वय २२ वर्ष, ४) भाऊसाहेब लक्ष्मण पवार , वय ६० वर्ष, ५) निलेश रामचंद्र बनसारे , वय ३४वर्ष, ६) रणसिंह अशोक पवार , वय ३५ वर्ष, ७) रेसल्या मॅनेजर राजपूत, वय ३७ वर्ष, सर्व. रा. उमठा पारधी बेडा, तह. नरखेड जि. नागपुर** असे एकुण ०७ आरोपी हे मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिंग भट्टी काढताना मिळुन आले. आरोपीचे ताब्यातून १) ३७० लिटर मोहाफूल गावठी दारू ५० रू लिटर प्रमाणे कि. १८५००/–रू. २) ७३००लिटर मोहाफूल सडवा रसायन कि. २० रु लिटर प्रमाणे १,४६,०००/–रू. ३) ३६ नग प्लास्टिक व ०६ नग लोखंडी ड्रम किंमती १९,८००/–रू ४) मोहाफूल गावठी दारू गाळण्याचे इतर साहित्य कि. ४८००/–रू असा एकुण कि. १,८९,१००/–रू चा मुदेमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. जप्त मुद्देमाल व कागदपत्रे पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे जलालखेडा यांचे ताब्यात देवून वरील आरोपी विरुद्ध पो. स्टे जलालखेडा येथे कलम ६५ (एफ), (सी), (ई), (ब) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक श्री. हर्ष पोद्दार, मा अपर पोलीस अधिक्षक श्री. रमेश धुमाळ,यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक आशिषसिंग ठाकूर, पोलीस उपनिरीक्षक आशिष मोरखडे, सफौ चंदशेखर गडेकर, पोहवा प्रमोद तभाने, रंजित जाधव, दिनेश अधापुरे, संजय बांते, मिलींद नांदुरकर, रोहन डाखोरे महिला पोलीस हवालदार कविता बछले, नितू रामटेके पोलीस नायक वनिता शेंडे यांनी पार पाडली.

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
## वाहनासह एकुण २१,४८,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक १०/०३/२०२४ रोजी पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, रामटेक ते तुमसर रोडने अवैधरित्या विनापरवाना रेती (वाळू) ट्रक मध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून रामटेक ते तुमसर रोडने एक पिवळया रंगाचा ट्रक क्र. MH 30 BD 4744 अशोक लेलॅड कंपनीचा १४ चक्का समोरून येतांनी दिसला. ट्रकला थांबवुन ट्रक चालकास ट्रकमध्ये काय आहे असे विचारले असता चालकाने ट्रकमध्ये रेती असल्याचे सांगितले. चालकास रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितले. ट्रक चा चालकाने विनापरवाना अवैदयरित्या रेती वाहतुक करतांना मिळुन आल्याने ट्रक मधील १६ ब्रास रेती किंमती ४८,०००/—रू. व ट्रक क्र. MH 30 BD 4744 किंमती २१,००,०००/— रू असा एकुण २१,४८,०००/—रूपयाचा माल जप्त करून ट्रक क्र MH 30 BD 4744 अशोक लेलॅड कंपनीचा मालक आरोपी नामे—राहुल अनिल हिरुळकर वय 23 वर्ष रा. वार्ड क्र 06 येवदा ता. दर्यापुर जि. अमरावती यांचेविरुद्ध पोस्टे रामटेक येथे अप क्र. १९९/२०२४ कलम ३७९, १०९ भा.द.वी. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता अन्वये पो. स्टे. रामटेक येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोनि प्रशांत काळे, सपोनि किशोरकुमार वैरागडे, पोहवा विनायक केदार यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर